Exh.No. 19

# नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब, ज्यु.डी

रे.मु.नं. यांचे कोर्टात

९९५/२०२४

**वादी**

अविनाश चांगदेव बानकर

**प्रतिवादी**

सोमनाथ बापुसाहेब शेटे, वगैरे

याकामी वादीचे साक्षीदार नं.२ चे ॲफिडेव्हिट असे ते खालीलप्रमाणे :-

याकामी मी रावसाहेब शिवाजी बानकर, वय-६८ धंदा-शेती, रा.शनिशिंगणापुर, ता.नेवासा, जि.अ.नगर, सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की -

Order
Read & Recorded.

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.11.05 17:53:09 +0530

Jt.CJJD

मी मौजे शनिशिंगणापुर, ता.नेवासा, जि.अ.नगर येथील कायमचा रहिवासी असुन मी वादी व प्रतिवादी यांना ओळखतो. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदरचे दाव्यातील दावा मिळकती हया मौजे शिंगणापुर, ता.नेवासा येथील गट नं.२५४ क्षेत्र २ हे. १७ आर+ पो.ख.०२, त्याची चतुर्सिमा पुर्व-गट नं.२४८, दक्षिण-गट नं.२५३ पैकी, पश्चिम-गट नं.११ पैकी, उत्तर-गट नं.२५५, २५७ पैकी येणेप्रमाणे शेतजमीन मिळकत असुन यापैकी दक्षिणेकडील पुर्व पश्चिम वाटणी वादीचे ० हे. ६७ आर मिळकत आहे.

दि.१८/०९/२०२४ रोजी वादी हे त्यांच्या वस्तीवरुन शिंगणापुरला येत असतांना प्र.वादी नं.१ ते ३ हे वादीला आडवे होवून म्हणाले की, येथुन पुढे रस्त्याचा वापर करु नका आम्ही रस्ता उकरुन व फोडून टाकणार आहोत व आम्ही दावा मिळकत कलम १ब ही तिऱ्हाईत इसमांस कायमस्वरुपी रस्त्यासहीत विक्री करणार आहोत, त्यावेळी वादीने समजावुन सांगितले की, सदर रस्ता पुर्वापार आहे, आम्हांला हया रस्त्याशिवाय दुसरा पर्यायी रस्ता नाही. प्र.वादी हे दावा कलम १ब ही तिऱ्हाईत इसमांस विक्री करण्याची सौदेबाजी चालु असुन प्र.वादी हे तिऱ्हाईत इसमांस वादी यांच्या जुना वागवहिवाटीच्या

Criminal Court Newasa

रस्त्यासह खरेदी, विक्री करण्याच्या तयारीत आहे. वादी यांना सदर रस्त्याशिवाय दुसरा पर्यायी रस्ता नाही. दावा मिळकतीत जाण्या येण्यासाठी वादीचा पुर्वापार वाग वहिवाटीचा रस्ता आहे, याची मला माहीती आहे.

येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट केले असे.

नेवासा

R S BANKAR

ॲफिडेव्हिट करणार

दिनांक -०५/११/२०२५

ओळख

(ॲड. ए.डी. आढाव).

याकामी मी रावसाहेब शिवाजी बानकर, वय-६८ धंदा-शेती, रा.शनिशिंगणापुर, ता.नेवासा, जि.अ.नगर, सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर नमुद केलेला संपुर्ण मजकुर हा माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आजरोजी माझी सही या लेखाखाली केली असे.

नेवासा

R S BANKAR

ॲफिडेव्हिट करणार

दिनांक -०५/११/२०२५

Solemnly affirmed before me
by Raosaheb Shivaji Bankar Age 68 occ Ag
who is identified before me
by Adv A D Adhav
whom I personally know
R/o Shanishingnapur

Asstt. Superintendent